# पटकथा लेखन

- डॉ. कविता मुरुमकर -

(1) **प्रस्तावना**

जीवनानुभव आणि सौंदर्याची व्याप्ती दृश्यक तंत्राच्या साह्याने अधिक नेमकेपणाने मांडणारी, सर्व ललितकलांना सामावून घेणारी चित्रपट ही एक सर्जनशील कला आहे. चित्रपट हे लोकरंजनाचे आणि लोकशिक्षणाचे प्रभावी साधन आहे. विशिष्ट आकृतिबंध असलेले सूचक दृश्यांचे संकलन म्हणजे चित्रपट. अनेक क्षेपणखंडांमध्ये आशयानुकूल दृश्यांतून हा आकृतीबंध साकार होतो. भाषा, ध्वनी, चित्र, गतिमानता या घटकांतून चित्रपट आकारास येतो. चित्रपट ही दृश्य-श्राव्य कला आहे. अर्थपूर्ण दृश्यांची संहिता म्हणजे चित्रपट होय. ही अर्थपूर्ण दृश्यांची संहिता जेव्हा लिखित स्वरूपात असते तेव्हा तिला पटकथा असे म्हणतात.

**पटकथा म्हणजे काय?**

लिखित दृश्यसंहितेला पटकथा असे म्हणतात. पटकथा हा चित्रपट, लघुपट, माहितीपट यांचा महत्त्वाचा घटक असतो. चित्रपट, लघुपट, माहितीपट यांची लिखित दृश्यसंहिता म्हणजे पटकथा होय.

- चित्रपट समीक्षक सीड फिल्ड (Syd Field) म्हणतात, 'A Screenplay is a story told with pictures and every picture tells a story.' पटकथा ही चित्रांच्या माध्यमातून सांगितलेली गोष्ट असते. प्रत्येक चित्र एक गोष्ट कथन करते. याचा अर्थ दृश्यप्रतिमा आणि शब्दप्रतिमा या परस्परपूरक असतात. दृश्यप्रतिमांच्या मांडणीची सलगता ही कथेची वाहक असते. कथा ही दृश्यप्रतिमांच्या मांडणीतून आविष्कृत होत असते. म्हणूनच पटकथाही कथाबीजाच्या आशय वाहकतेत सातत्य ठेवते.
- सुप्रसिध्द दिग्दर्शक सत्यजित राय म्हणतात, 'पटकथा ही चित्रपटाचा सांगाडा असते. दृश्य आणि ध्वनी यांच्याद्वारे पडद्यावर जे व्यक्त होते, ते पटकथेचे खरे इंगित.'
- दृश्य आणि ध्वनी यांच्या संयुक्ततेतून दृश्यप्रतिमेचा आशय आविष्कृत होत असतो. अनेक दृश्य प्रतिमांच्या साहाय्याने कथेचा आशय

साकारला जातो.

- चित्रपट, लघुपट, माहितीपटांमध्ये पटकथेस अत्यंत महत्त्व असते. पटकथेचे महत्त्व विशद करताना नश अँड ओके म्हणतात, 'A Screenplay is a blueprint of a movie.'

### पटकथेचे स्वरूप

पटकथेची भाषा दृस्यात्मक असते. दृस्यात्मकतेची भाषा पटकथाकारास ज्ञात असणे गरजेचे असते. कारण चित्रपट, लघुपट, माहितीपट यात दृस्यसंकल्पनेला महत्त्व असते. पटकथाकाराच्या लिखित दृस्यसंहितेला दिग्दर्शक मूर्त स्वरूप देतो. दिग्दर्शक हे करीत असताना दृस्यक (कॅमेरा), संपादन, ध्वनिपरिणाम यांच्या साह्याने लिखित दृश्यसंहितेस दृश्यप्रतिमा आणि ध्वनिप्रतिमेच्या संयोगाने साकार करीत असतो. Shot (क्षेपणखंड), Frame (प्रतिमा), Into View (च्या दृष्टीतून) या प्रतिमांच्या आनुषंगाने Close-Up (अति समीप दृश्य), Close Shot (समीप क्षेपणखंड), Medium-Short (मध्यम क्षेपणखंड), Long Shot (दूर क्षेपणखंड), Extreme Long Shot (अतिदूर क्षेपणखंड) या भाषिक संज्ञेच्या आनुषंगाने चित्रपट साकार होत असतो. पटकथा लेखक माध्यमाचा विचार करून पटकथा लेखन करीत असतो. दृश्यसातत्य, कथानक, स्वभावरेखन, संवाद, प्रतीक हे घटक पटकथेला गतिमान करत असतात. म्हणून पटकथेच्या संरचनेचे हे घटक महत्त्वपूर्ण अंग ठरतात.

### पटकथेचे घटक

पटकथा ही संबंधित विषयाची Blue Print असते. पटकथेच्या संरचनेत दृश्यसातत्य (Scene Continuity), कथानक, स्वभावरेखन, संवाद, प्रतीक या घटकांना महत्त्व असते. या घटकांच्या आधारे पटकथेची उभारणी होते. पटकथेला गतिमान करणारे हे घटक महत्त्वाची भूमिका बजावतात.

**१) दृश्यसातत्य** – पटकथा ही चित्रित होणाऱ्या दृश्यांची संहिता असते. पटकथा ही कथाबीजाचे दृश्यसातत्य (Scene Continuity) असते. पटकथेतील प्रत्येक दृश्य स्वतंत्र आणि अर्थपूर्ण असते. अशा दृश्यांना समान धाग्यात जोडणे म्हणजे दृश्यसातत्य (Scene Continuity) होय. म्हणूनच पटकथेला दृश्यांची सेंद्रिय संरचना असते मानतात. प्रत्येक दृश्याला संकल्पित अर्थ असतो. जो पुढील दृश्यांशी अन्वयार्थ जोडणारा असतो. पटकथेतील प्रत्येक दृश्य एक स्वतंत्र कथा असते. त्याला आरंभ, मध्य, शेवट असतो. या दृश्यसातत्येत एका दृश्याचा दुसऱ्या दृश्याशी निकटचा संबंध असतो. प्रत्येक दृश्य स्वतंत्र असले तरी दृश्य संलग्नता हे पटकथेच्या संहितेचे वैशिष्ट्य असते. या दृश्य संलग्नतेतून जी दृश्यमालिका साकार होते त्यातून पटकथेची कथात्मक दृश्यसंहिता गतिमान

होते. अर्थपूर्ण दृश्यांच्या सातत्यतेतून आणि संलग्नतेतून दृश्यसंहितेची संरचना स्पष्ट होऊन पटकथेचा आकृतीबंध आकारास येतो.

२) **कथानक** – कथा आणि दृश्य यांची परस्परपूरक सांगड म्हणजे पटकथा होय. पटकथेच्या आकृतीबंधात कथानकाला महत्त्व असते. पटकथेतील भाषा, प्रसंग, पात्रे, वातावरण, प्रतीकं, संवाद यांच्या संयुक्तीकरणाच्या मुळाशी कथाबीज असते. शब्द प्रतिमेच्या चौकटीतील कथा दृश्य प्रतिमेत साकारते तेव्हा ती पटकथा होते. पटकथा ही लघुपट, माहितीपट, चित्रपट यांचा सांगाडा असते कथाबीजाचे दृकश्राव्य माध्यमाच्या परिभाषेत रूपांतर होते तेव्हा ती पटकथा होते. कथानकाच्या घटकात कथेचा विकास, संघर्ष, नाट्यमयता असते. कथानकात विकसितता असावी, कथानकाचा विकास म्हणजे प्रत्येक दृश्याचा विकास असतो. दृश्यात्मक परिभाषेतून कथानक आविष्कृत होत असते. कथेचा प्राण संघर्ष असतो. संघर्षामुळे कथा गतिमान होते. पात्रांचा आंतरिक संघर्ष आणि बाह्य संघर्ष तसेच नायक–प्रतिनायक–खलनायक यातील संघर्ष. या संघर्षामुळे कथानक परिणामकारक होत असते. पटकथेचा आरंभ, मध्य आणि शेवट या तीन टप्प्यांमध्ये कथा विभागली जाते. कथानकाच्या आरंभी कथाबीजाची उभारणी असते, मध्यात संघर्ष दर्शविला जातो आणि शेवटी कथाबीजाचे पृथक्करण करून कथानकाला गतिमान केले जाते. पटकथेतील कथानकातून दृश्यसातत्य आणि संलग्नतेतून कथाबीजाचे कथन केलेले असते.

३) **स्वभावरेखन** – पटकथेच्या कथाबीजाचा विकास करण्याचे, कथाबीजाला गतिमान करण्याचे कार्य स्वभावरेखन करते. स्वभावरेखनातून होणारे विविध भावनांचे आविष्कार, संघर्ष, द्वंद्व कथानकाला विकासित व प्रवाहित करतात. पटकथेच्या पात्रांतील बाह्यसंघर्ष आणि अंतर्गत संघर्ष दर्शविण्याचे कार्य स्वभावरेखन करते. अंत:स्वभाव आणि बाह्यस्वभाव यांच्या आविष्कारातून पात्र उभे राहते. जीवनानुभवाला भिडण्याची ताकद स्वभावरेखनात असते. त्यामुळे प्रेक्षक कथाबीजाशी सहजपणे तद्रुप होतो. स्वभावरेखनामुळे प्रेक्षक सहजपणे व अधिक नेमकेपणाने कथानकातील संघर्ष नाट्य अनुभवू शकतो.

४) **संवाद** – मानवी संभाषण प्रक्रियेत संवाद हा महत्त्वाचा घटक असतो. मानवी भावभावनांचे प्रकटीकरण करण्यासाठी, पात्रांचे स्वभावरेखन करण्यासाठी संवाद गरजेचे असतात. संवाद हा नाटकाचा प्राण आहे. कथात्मक निवेदन पध्दतीत संवाद महत्त्वाचे ठरतात. कारण स्वभावरेखनासाठी संवादांचा उपयोग करून कथाबीजाला गतिमान करता येते. लघुपट, माहितीपट, चित्रपटांत इतर वाङ्मय प्रकाराच्या तुलनेने संवादास दुय्यम स्थान असते. कारण चित्रपट, लघुपट, माहितीपटात दृश्यभाषेला महत्त्व असते. इथे दृश्यभाषा हाच संवाद असतो.

त्यामुळे संवादाला दुय्यम स्थान असते. असे असले तरी संवादाचे महत्त्व टाळता येत नाही. कथा स्पष्ट करण्यासाठी आणि पात्रे स्पष्ट करण्यासाठी संवाद उपयोगी पडतात. पटकथेतील संवाद दृश्यात्मकतेला अनुरूप असतात. संवाद हे कथाबीजाचा विकास साधणे, पात्रांचे स्वभावरेखन स्पष्ट करणे, पात्रांचा विकास करणे इत्यादीसाठी उपयुक्त असतात. दृश्यात्मकतेशी सुसंगत असणारे संवाद पटकथेत असणे गरजेचे असते.

**५) प्रतीक** – आपल्या इंद्रियसंवेदनांना सांकेतिक अर्थ देणारी वस्तू, घटना, चिन्ह म्हणजे प्रतीक होय. पटकथेमध्ये कथानक, पात्रे, संवाद यांना जसे महत्त्व असते तसेच प्रतीकांनाही महत्त्व असते. प्रतीक म्हणजे चिन्ह. पटकथेच्या दृश्यसंहितेत आशयाभिमुख, दृश्यसंहितेच्या आनुषंगाने काही चिन्हांकित दृश्यप्रतिमा वापरल्या जातात. त्या प्रतीकरूपाने साकार होतात. प्रतीकाच्या माध्यमातून विशिष्ट अर्थ, संवेदना, भावनांचा आविष्कार होतो. सूचकतेने चिन्हांनी निर्देशित होणाऱ्या दृश्यप्रतिमेला दर्शविले जाते. सूचकता ही प्रतीकांची परिभाषा असते. पटकथेच्या दृश्यसंहितेत येणारे प्रतीकदृश्य एखाद्या पात्राप्रमाणे आपली भूमिका बजावित असते. विशिष्ट घटनांचा, वस्तूचा, आशयाचा निर्देश करणे, आशयाला नवे परिमाण देणे, कलाकृतीची सौंदर्य व्याप्ती वाढवणे, पटकथेच्या कथानकाचा विकास साधण्यास साहाय्यभूत होणे ही प्रतीकांची कार्ये असतात. पटकथेच्या दृश्यसंहितेतील प्रतीक केवळ साहाय्यभूत घटक न राहता ते त्या दृश्यसंहितेतील प्रमुख घटक बनतात. दृश्यसंहितेतील 'मोण्टाज' दृश्ये ही प्रतीकरूपच असतात.

### पटकथेचे (दृश्यसंहिता) लेखन

पटकथेचा कालावधी (time frame) ठरवण्यासाठी तुम्ही लघुपट, माहितीपट, चित्रपट यांपैकी कशासाठी पटकथालेखन करणार आहात ते प्रथम निश्चित करणे गरजेचे आहे. त्यानंतर विषय ठरवणे, कधी कधी आधी विषयही ठरवला जातो. दृश्यसंहिता लिहिताना 5W अर्थातच पाच W महत्त्वाचे असतात. Who, When, Why, What, Where. म्हणजे कोण? कधी? का? काय? कुठे? या पाच प्रश्नांभोवती तुमच्या पटकथेची संरचना गुंफलेली असते. त्यानंतर कथेचा परिचय, पटकथेतील महत्त्वाची पात्रे, त्यांतील संघर्ष, संघर्षातून उद्भवणाऱ्या अडचणी, अडथळे, संघर्षाचा परिणाम जो चांगलाही असू शकतो व वाईटही असू शकतो. या मुद्दयांच्या आनुषंगाने लेखन करावे लागते.

### पटकथेच्या (दृश्यसंहिता/स्क्रीन प्ले) लेखनाचे ठळक मुद्दे

- पटकथा लेखनाच्या सुरुवातीला Slugline ठरवतात. जिला Header किंवा Oneline theme ही संबोधले जाते. येथे कथाबीजाचा आशय संक्षिप्त ओळीत सांगणे अभिप्रेत असते.

- दृश्य घरात किंवा घराबाहेर (Indoor or Outdoor) घडणार आहे हे दर्शविले जाते. त्याचवेळी त्याचे ठिकाण (Location), वेळ (Time) दर्शविणे महत्त्वाचे असते.
- पात्रांचे नाव-नावासमोर त्यांचा संवाद लिहिणे. जर दोन पात्रे एकाच वेळी बोलत असतील तर duel dialogue लिहिणे.
- दृश्यामध्ये पात्र प्रत्यक्षात नसून फोनवर किंवा मोबाइलवर केवळ त्याचा आवाज येत असेल तर त्या पात्राचे नाव-संवाद-त्यासमोर Voice over लिहिणे गरजेचे असते.
- पात्र मोबाइलवर बोलत असेल व ते दृश्यांमध्ये प्रत्यक्ष दिसत असेल तर Into Phone असे पात्राच्या संवादासमोर लिहावे.
- दृश्यामध्ये पात्र असेल परंतु ते कॅमेऱ्यात न दिसता त्याचा आवाज येत असेल तर Off Screen dialogue लिहावे.
- Parentheticals लिहून त्यासमोर पात्रांच्या प्रतिक्रिया (Reaction) लिहिल्या जातात.
- Character Position लिहून त्यासमोर दृश्यात पात्रे कोण आहेत, ती कुठे उभी आहेत, कुणाकडे पाहत संवाद बोलत आहेत हे लिहावे.
- Camera Positions लिहून त्यासमोर कॅमेरा कुठून कुठे शूट करेल. उदा. कॅमेरा हॉलमधून किचनकडे शूट करेल. पूर्ण शॉट मिड शॉट असेल याप्रकारे दृश्याच्या आनुषंगाने जे दर्शविणे गरजेचे आहे ते लिहिणे.
- Cuts and Transition दर्शवताना एक दृश्य संपून दुसरं दृश्य सुरू होत असेल तर Cut to....... लिहावे. त्यापुढे त्या संपलेल्या दृश्यांशी संलग्न असलेल्या पुढील दृश्याच्या ठिकाणाचा उल्लेख असावा.

**पटकथा लेखन नमुना**

Slugline : अज्ञान मुलांनी वाहन चालवू नये. वाहन चालवताना आढळल्यास सदर पाल्यांच्या पालकांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते.

| Scene no | Indoor/ Outdoor | Location | Time | Day/Night |
|---|---|---|---|---|
| १ | इनडोअर | घर | ८.०० | सकाळ |

- Description -

(कथेतील नायक मुलगा कबीर दहावी उत्तम मार्कांने पास आहे. घरात आईवडील, बहीण, कबीर यांचा संवाद)

Character Name : Dialogues

**कबीर** : बाबा तुम्ही म्हणाला होता की, तुला दहावीला ९० टक्केच्या पुढे मार्क्स पडले तर छान गिफ्ट देणार. मग आता द्या. मला कॉलेजला जायला बाईक हवी आहे.

Parentheticals : *(सगळे एकमेकांकडे पाहतात. आई, बाबा, बहिणीच्या चेहऱ्यावर आश्चर्य आहे तर कबीर आनंदात आहे.)*

Character Name : Dialogues

**बाबा** : अरे, तू अजून लहान आहेस. तुझी बारावी झाल्यावर बाईक घेऊ, तेही सीईटीला चांगले मार्क्स पडले तर. आता दुसरं काहीतरी माग, देईन.

Parentheticals : *(कबीर नाराज आहे. आई व बहीण बाबांच्या मताशी सहमत असल्याचे मान डोलावून दर्शवतात.)*

Character Name : Dialogues

**आई** : अरे, असा नाराज होऊ नकोस. तुझं वय लहान आहे. ड्रायव्हिंग लायन्सस तरी मिळेल का?

Character Name

**बहीण/नेहा :** अठरा पूर्ण होईपर्यंत वाट बघ बाईकची.

Parentheticals : *(बहीण चिडवण्याच्या मूडमध्ये आहे. कबीरची नाराजी वाढलीय. आई स्वयंपाक घरात जाते. बाबा ऑफिसला जातात. कबीरचा मोबाइल वाजतो. त्याच्या मित्राचा कॉल येतो.)*

**कबीर** : हॅलो. हं बोल राजू (Into phone)

**राजू** : अरे ये ना यार, कॉलेजमध्ये नेहमीच्या ठिकाणी जमलोय. रात्रीच्या पार्टीचं नियोजन करतोय. ये लवकर, वाट पाहतोय. (Voice Over)

**कबीर** : येतो. (Into Phone)

**राजू** : ये जरा लवकर. (Voice Over)

Parentheticals : *(कबीर निघण्याच्या लगबगीत. नेहा वाचत बसलीय. आई किचनमध्ये आहे.)*

**आई** : कबीर नाष्टा केला नाहीस तू अजून. तुझं सॅण्डवीच तसंच आहे पडून डायनिंग टेबलवर, खा बरं ते. (Off Screen)

**कबीर** : भूक नाही. नको मला.

**आई** : चहा करू का मग? मला आणि नेहाला चहा ठेवतेय मी. (Off Screen).

**कबीर** : नकोय तोही.

Character Positions

*(कबीर पाठीला सॅक आडकवत किचनकडे तोंड करून जोरात म्हणतो.)*

**कबीर** : आई, कॉलेजला निघालोय.

Camera positions and camera angles

*कॅमेरा किचनकडून कबीरला शूट करेल. पूर्ण शॉट मिड शॉट असेल.*

Cuts and transitions

*कबीर हॉलमधून बाहेर पडतो... कट टू कॉलेज कॅम्पस.*

| Scene no | Indoor/ Outdoor | Location | Time | Day/Night |
|---|---|---|---|---|
| २ | आऊट डोअर | कॉलेज | ९.०० | सकाळ |

- Description -

(कॉलेजमध्ये एका झाडाखाली कबीर व कबीरचे काही मित्र निखिल, करण उभे आहेत.)

**राजू** : रात्रीच्या पार्टीचं ठरलं तर.

**कबीर** : आपल्या सगळ्याच दोस्तांना एकाच कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळालं, याचा खास आनंद सेलिब्रेशन करायलाच पाहिजे.

**राजू** : ही पार्टी झाल्यावर अजून एक पार्टी सेलिब्रेट करणार आहोत.

**करण/ निखिल** : कशाची रे यार. (Dual dialogue).

**राजू** : कबीर बाईक घेणार आहे.

**कबीर** : नाही यार. बाबा नाही म्हणाले. बारावी झाल्यावर घेऊ म्हणाले. अजून दोन वर्षे वाट पाहावी लागेल.

**किरण** : का रे, तू म्हणाला होतास घेतील म्हणून.

**कबीर** : अठरा वर्षे पूर्ण नाहीत म्हणाले. तोपर्यंत देणार नाहीत.

**निखिल** : काहीतरी काढतात. बघ मी तर आठवीपासून गाडी चालवतोय. नववी दहावीची ट्यूशन्स घरापासून किती लांब, बाईकवर तर यायचो.

**कबीर** : खरंच यार. तेव्हासुध्दा बाबांनी सायकलवरच पाठवलं ट्यूशन्सला. अजून दोन वर्षे सायकलच वापरावी लागणार....

राजू : कब्या, यार तुझ्या लुकला बाईकच शोभून दिसते. कॉलेजला यावं तर बाईकवर यार...

कबीर : गप्प रे, जखमेवर मीठ चोळू नको. मग तू का येत नाही बाईकवर.

राजू : अरे यार आपला बाप कुठे पैसेवाला आहे. नाहीतर कधीच घेतली असती बाईक... पण जाऊ दे आजच्या पार्टीसाठी तर तुझ्या बाबांची बाईक घेऊन ये. माझ्या घरून जाऊ पार्टीला. मी येतो तुझ्याबरोबर.

**कबीर** : अरे देणार नाही बाबा त्यांची बाईक.

**निखिल** : अरे विचारतोस कशाला, गुपचूप आण.

**किरण** : अरे कॉलेजला आलोय. आता प्रत्येक गोष्ट आईबाबांना काय विचारायचीय. गुपचूप आण. नंतर चावी ठेवून टाक. कळणारही नाही त्यांना.

**कबीर** : बघू, प्रयत्न तर करतोय.

Character Positions

*सगळे एकमेकांसमोर उभे राहून एकमेकांना टाळ्या देतात.*

Camera positions and camera angles

*कॅमेरा कबीरच्या चेहऱ्यावर आणि निखिलच्या हातात असलेल्या त्याच्या बाईकच्या चावीवर आहे. निखिल हाताच्या बोटात चावी फिरत राहतोय.) कॅमेरा हाताच्या बोटावर चावीचं फिरणं प्रतीकात्मक रूपाने (मोण्टाज) शूट करेल.*

Cuts and transitions

*सगळे कॉलेज कॅम्पस्मधील त्या झाडाखालून वर्गाकडे निघतात.*

*कट टू कबीरचे घर.*

| Scene no | Indoor/ Outdoor | Location | Time | Day/Night |
|---|---|---|---|---|
| ३ | – | घराचे अंगण | ७.०० | सकाळ |

- Description -

*(कबीरच्या घराचे अंगण. वडील बागेला पाणी देत आहेत. आई बागेतील फुले तोडत आहे. पोलीसवेशात दोन पोलीस येतात.)*

**पोलीस नं.१** : मनोहर शिंदे यांचं घर हेच का?

**कबीरचे बाबा** : हो.

**पोलीस नं.१** : आहेत का मनोहर शिंदे?

**कबीरचे बाबा** : हो मीच. आपण?

**पोलीस नं.१** : एमएच-१३ सीएच-१६६६ नंबरची गाडी तुमचीच का? या गाडीने काल रात्री अपघात केलाय. त्यात एका वृध्द स्त्रीचा मृत्यू झालाय. CCTV फुटेजमध्ये एक मुलगा ही गाडी चालवतानाची दृश्ये आम्हाला मिळाली आहेत. सदरची गाडी तुमच्या नावे असल्याची नोंद आहे.

**कबीरचे बाबा** : (घाबरून) अरे बापरे... कबीरऽऽऽऽ

**कबीरची आई** : *(ट्रान्समध्ये) वडिलांचं लक्ष नसताना किबोर्डला लटकवलेली बाईकची चावी कबीर चोरून घेताना आईने पाहिलेले असते. पण ती दुर्लक्ष करते.*

**पोलिस नं.१** : चला आता पोलीस चौकीत, तुम्हाला माहीत नाही का अज्ञान मुले वाहन चालवताना आढळल्यास दंडात्मक कारवाई होते. सदर पाल्याने अपघात केल्यास पालकांना दंडात्मक कारवाईसहीत तुरुंगवासाची शिक्षा होते.